न. १०७

म. ग्रं. सं. ठाणें

विषय काव्य

संग्रहालय क्रमांक ८२

लेखक ग.वा.जोशी

पुस्तकाचें नांव शोकार्य गीत

सन १८८०

सन १८८० शो.काव्य २०२

१०९

( आवृत्ति २री. )

# शोकार्तगीत.

अथवा

## प्रसिद्ध गणेश वासुदेव जोशी यांच्या मरणानें दुःख पावलेल्या आर्यबंधूंचा विलाप.

विक्रीचा पैसा स्मारकाकडे लावावयाचा.

पुणें येथें

" श्री शिवाजी " छापखान्यांत छापिलें.

किंमत २ आणे.

# सूचना.

—oo—

ह्या पुस्तकांत, कैलासवासी रा० रा० गणेश वासुदेव जोशी उर्फ सार्वजनिक काका यांच्या आर्यबन्धूंनीं त्यांचे देशाभिमानादि सर्व सद्गुण व त्यांनीं केलेलीं अनेक सत्कृत्ये हीं आठवीत आठवीत त्यांच्या अकालिक मृत्यूनें आपणांस झालेलें परमावधि दुःख प्रदर्शित केलें आहे. त्यांचे यशोरूप ध्वजस्तंभ कोण कोणते काळीं उभारले गेले ह्याचें टिपण प्रत्येकाजवळ असावें ह्मणून त्या त्या स्थळीं तो तो काल दर्शविला आहे.

कीर्तिरूपानें काका अद्यापि जिवंतच आहेत खरे, तथापि देहित्वानें तरी ते आज आपणांस दृष्टिगोचर नाहींत; करितां न जाणो कदाचित् त्यांचा विसर पडेल; तो न पडावा या हेतूनें पुस्तकारंभीं त्यांची एक लहानशी तजवीर जोडली आहे.

हें पुस्तक ह्मणजे काकांचें एक स्वतंत्र स्मारकच होय. तथापि यापुढें जें कांहीं त्यांचें अक्षय्य असें एक स्मारक होणार आहे त्याचें हें साहाय्यकारी ही पण आहे; कारण ह्याच्या विक्रीचा जो पैसा जमेल त्याचा विनियोग त्या मोठ्या स्मारकाकडे करण्याचें योजिलें आहे.

# आवृत्ति दुसरी.

——oo——

या पुस्तकाच्या प्रथमावृत्तीच्या बहुतेक प्रती विकण्याकरितां गांवोगांव पाठविल्या आहेत. त्या बहुतेक करून विकल्या जातील असा अदमास आहे. दोन तीन ठिकाणांहून ज्यास्ती प्रतींची मागणी झाल्यामुळें ही दुसरी आवृत्ति काढणें जरूर पडलें आहे.

मागील खेपेस फार धांदल उडाल्यामुळें तजबिरीची चांगलीशी व्यवस्था करतां आली नाहीं. परंतु आतांची तजबीर फार सुरेख व अगदीं हुबेहूब असून पुस्तकारंभीं जोडली आहे.

ता० २५ माहे आगष्ट सन १८८०

# शोकार्तगीत.

## कै० गणेश वासुदेव जोशी.

जन्म—चैत्र शु० ३ शके १७५१.

मृत्यु—आषाढ व० ४ शके १८०२.

### श्लोक.

अरेरे ! गेला ना ! शिव ! शिव !—दुजा कोणि न मिळे
पुण्याचें या गेलें—अहह ! अजि ऐश्वर्य सगळें ! ।
किती कामें झेंपी ! खटपट किती ! श्रान्त न तरी !
स्वदेशाची सेवा निशिदिनिं मना पासुनि करी ॥ १ ॥

चंद्रप्रकाशाविण रात्र जैशी
नृपाविणें राष्ट्र जसें उदासी ।
भयाण जैसा विजन प्रदेश
तैसा अभावीं तव आर्यदेश ॥ २ ॥

त्वत्तुल्य कोठें मोहरा मिळेल
ही काळजी नित्य मना जडेल ।
वारावयासी नुरला दुजा ते
कैशी बरें सांग निघोनि जाते ॥ ३ ॥

## साक्या.

स्थापियली त्वां सभा जियेस्वें सार्वजनिक हें नाम ।
सुयंत्र चाले अद्यापी ती—विफल न एक हि काम ॥ ४ ॥
बाल्यावस्थेमधें होति तों तूंच पोशिलें तीतें ।
म्हणुनि आज या दशेस येउनि ती पोशी आर्यांतें ॥ ५ ॥
जनकामागें प्रीती तत्सम कोण करिल मजवरती ।
यापरि चितादग्ध न होतां पुष्टचि होऊ परती ॥ ६ ॥
परदेशींच्या वस्त्रा त्यजुनी आत्मदेशिचीं नित्य ।
वस्त्रें वापरण्याचा केला त्वां दृढ निश्चयें सत्य ॥ ७ ॥

## श्लोक.

तो सारखा चालविलास नेकीं
वर्षें नऊ—बाध दिनीं न एकीं ।
सर्वत्र पोषाख तुझा असाच
मार्गीं गृहीं राजसभेंत साच ॥ ८ ॥
कित्ता अशा घालुनिया दिलास
खरा—परंतू न अशांस आस ।
मागें तुझ्या कीं गिरवूं अम्हीं तो
गेला गुरू शिष्य कि झोंप घेतो ॥ ९ ॥

---

१ चैत्र शु० १ शके १७९१. २ ता० १२ ज्यान्युअरी १८७२

बरदनगरिं जेव्हां दुष्ट टोंचीत होते
शरणरहितभूपा दीनमल्लाहरीतें।
अबब ! किति तुझें तें धैर्य !—तेव्हांच कीं तूं
सरशि नृपसहाया एकटा—नाहिं कितू ॥ १० ॥
स्वार्थाकडे नजर नाहिं कधीं दिलीस
कर्ये हजार जरि नेलिस तूं तडीस।
कां कीं स्वतां वकिलिचा करुनी हि धंदा
त्वां लाविलें भरतखंडिं लवादकंदा ॥ ११ ॥
त्याला इथे प्रथम अंकुर फूटलासे
त्वत्सेचनेकरुनि विस्तृत शोभलासे।
तेणें पुढें हळुहळू फलपुष्पधारी
झाला तसा सकलदुःखितदुःख वारी ॥ १२ ॥
शाबास ! शाबास ! गणेशराया
वृद्धापकाळीं हि विदेशिं जाया।
केला तुवां धीरे कि विद्विषांचा
येरीति संग्राम शमेल साचा ॥ १३ ॥
अशा कुसंग्रामिं सुबोध द्याया
निघूं पहाशी यवनाधिराया।
केलीस बा यापरि कीर्ति लोकीं
स्वराजनिष्ठा तव कोण शंकी ? ॥ १४ ॥

---

१ ता० १५ जान्युअरी १८७६. २ मन १८७८.

धर्मशास्त्रनिपुणा ! तुझ्या मतें
जे विचार असती अगाध ते ।
होति मान्य—कि फिरे च कायदा
त्वां दिला करुनि हा हि फायदा ॥१५॥

**साक्या.**

अतोनात कीं जुलूम होता रयतेवरि धनिकांचा ।
ज्यानें त्यानें लाथा द्याव्या वालि न कोणि कुणाचा ॥१६॥
परि आतां ती मुक्त जाहली पेचांतुनिया त्यांच्या ।
नव्या[1] कायद्यामुळें तूंचि वा मुळ्या लाविल्या ज्याच्या ॥१७॥

**दिंड्या.**

वायकांनीं प्रतिवर्षि नियतकाळीं—
आत्मकार्यचि जणु—हळदे[2]कुंकुं भाळीं ।
जमुनि आधीं विष्णुच्या मंदिरांत
लावयाला पाहिजे आपसांत ॥ १८ ॥
तशी विजयादशमी[3] हि वार्षिकी च
पूरुषांनीं साजरी करावीच ।
थाटमाटानें ध्वजा फडकवावी
पुढें सीमोल्लंघना धांव घ्यावी ॥ १९ ॥

---

१ सन १८७९ चा १७ वा आक्ट. २ चैत्र वद्य १३ शके १७९५. ३ आश्विन शु० १० शके १७९४.

## श्लोक.

एकी नाहीं हिंदुलोकांमधें हें
जाणोनी त्वां काढिली तोड कीं हे ।
दुर्दैवें ती कोठुनी लाभणार !
गेली—गेली अल्पकाळांत पार ॥ २० ॥

विद्येची तुज हौस रे किति तरी होती ह्मणोनी वदूं !
इंग्रेजी शिकलास थोरपणिं तूं तैसेंचि बा ऊडदू ।
या योगें करुनी स्वतां बहुविधा ज्ञानामृता प्राशिलें
प्रेमानें निजशूद्रबान्धवजनां तें मागुती पाजिलें ॥ २१ ॥

राजियांस बहुतांस भेटुनी
गोड गोड बहु बोल बोलुनी ।
बोधदुग्ध अति त्यांस पाजिलें
जाणते करुनि ते हि सोडिले ॥ २२ ॥

धर्मार्थ कृत्यें हि अनेक केलीं
प्रजा दुकाळीं[1] किति वांचवीली ।
त्वां विष्णुमंदीरें[2] हि निर्मियेलें
रोगी[3] बरे तेथ बहूत केले ॥ २३ ॥

---

१ सन १८७६—१८७७ चा दुष्काळ. २ सन १८६८ माहे मे. ३ सन १८७४ सालीं धर्मार्थ दवाखाना घातला होता तो सारखा दोन वर्षे चालला.

व्याख्यानांचे घाव त्वां मारुनीया
जेथें तेथें रोंविले भारतीं या ।
नानारूपी कीर्तिचे स्तंभ थोर
ज्यांसी नाहीं काडिचा एक घोर ॥ २४ ॥

स्वदेशजननी प्रजा प्रसवली न जीला मिती
त्वदन्य परि पुत्र जे हरघडी तिला नाडिती ।
तुझ्याविण तिचा क्षणक्षणिं न कोणि कैवार घे
खरोखर दुजा कृतज्ञ तुझिया परी ना निघे ॥ २५ ॥

भक्ति जाणुनि तुझी जननी हे
आर्द्रदृष्टि करुनी तुज पाहे ।
यामुळेंच जणु तूं नियमानें
सेविले पद तिचे अभिमानें ॥ २६ ॥

हरप्रदेशीं हि हरप्रसंगीं
तुवां असावें—गुण काय अंगीं ! ।
ऐशा गुणें विष्णुविभुत्व सारें
त्वां लोपवीलें जणु काय धीरें ॥ २७ ॥

जें काम हातिं धरिलें निरपेक्षतेनें
तें लाविलें तडिस तूं अतिदक्षतेनें ।
ऐसा पराक्रमि दुजा न मिळे अह्मांस
होतें बरें अजुनि हो जरि वांचतास ॥ २८ ॥

स्वभावानें भोळा असाशि तरि सर्वत्र न तसा
सदा चित्तीं ताठा परि दिससि सर्वत्र नतसा ।
न गर्वा वाहीलें कधि हि अभिमाना धरियलें
तुवां अंगीं धैर्य प्रचुर–नसुनी शौर्य–वहिलें ॥ २९ ॥

होतीं जेव्हां येत विघ्नें अपार
तेव्हां आम्हां पाहिले त्यांचि पार ।
ऐशा योगें तूंच वा भूसुरेश
सर्वत्रांचा विघ्नहर्ता गणेश ॥ ३० ॥

होती अतिश्रम जरी तरि त्वां खपावें
रातंदिशीं कि निजबन्धु सुखी रहावे ।
होतें असें तरि तुला दुखणें न ठावें
शीतोष्णवृष्टिपवनीं तुज भीत जावें ॥ ३१ ॥

**गणेशा !** वा वानूं किति तरि तुझ गूण अमित
जयांच्या योगानें बुधजन तुला होति नमित ।
न जिव्हा चाले ही अतिशयित दुःखार्त कि मन
गणेश प्रत्यक्षीं म्हणवुनि अम्ही वाहुं सुमन ॥ ३२ ॥

तव शरीर महाविटपीच कीं
ज्वरदवें जळला दिनसप्तकीं ।
कफकुठार झणी बसतां क्षणीं
पहुडला धरणीवरि येउनी ॥ ३३ ॥

## साकी.

माता तुझी ढळढळ रडते सुत आणिक तव दारा ।
बन्धु तसे हे अश्रु ढाळिती कीं नुरला त्यां थारा ॥३४॥

## श्लोक.

होतां वियोग तव आज समग्र जाती
शोकाब्धिभीतरिं अनाथ बुडोनि जाती ।
आबालवृद्ध तुज जाणुनि सर्व होती
जेथें तिथें गुण तुझे मनिं आठवीती ॥ ३५ ॥
जंव जगीं जगला तव काय तो
जन बहू रमला तव काय तों ।
पण बरीक अतां झुरुनी मनीं
हळु हळू निघती तव मार्गणीं ॥ ३६ ॥

## दिंड्या.

देहरूपी तूं मृत्यु पावलासी
कीर्तिरूपानें परी वांचलासी ।
मृत्तिकेचें जणु पात्र फुटुनि जावें
हतीं सगळें आंतील द्रव्य यावें ॥ ३७ ॥
विरहदुःखा यापुढतिं वीसरावें
अम्हीं मितांहीं सदा तेला ध्यावें ।

म-काव्य
९ २५०२

वाढुनीया अप्रतिमगुणांनीं च
देव झालासी अम्ही परम नीच ॥ ३८ ॥

## श्लोक.

खोटा शोक हवा कशास परता? सोडोनि द्या तो कसा
आर्यांनो हृदयीं जरी कळवळा वासा करी शुद्धसा।
काकाचे गुण घ्या तया अनुसरा प्रत्येक कामीं तुम्ही
काका एक गमावुनी कमवुं कीं काकाच काका अम्ही ॥ ३९ ॥

कृष्णपक्ष सुरु जाहला असे
चंद्रिकासुख तरी मिळे कसें।
हो—कशास हवि काळजी बरें?
हो न जोंवरि दिनावसान रे ॥ ४० ॥

भार्या करो लवकरी तव संगमातें
भ्राते न जाच कधि देउत वृद्धमाते।
नांदोत सर्व सुत आणि सुता सुखानें
वांचोत येथ चिरकाळ तुझ्या कृपेनें ॥ ४१ ॥